Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue : 282

November 2021

## Recent Trends in Research




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

For Details Visit To : www.researchjourney.net 217

SWATIDHAN PUBLICATIONS

November-2021 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

**Issue : 282**

## Recent Trends in Research

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo : Internet

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-



218

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre -** Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali -** Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar-** BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

# INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Cryptography & Steganography Techniques : A Survey | Mr. Rakesh Rane, Dr. B. H. Barhate | 05 |
| 2 | Importance of Computer in Research | Dr. Megha Sawarkar | 12 |
| 3 | Investigation of Effect of Heavy Metal of Vegetables Plant Growth (Trigonella Foenum groecam ) | Prof. Miss Neel Yashoda Ramesh | 15 |
| 4 | Inescapable Biological Events and Inescapable Impact: International Politics in the Wake of COVID-19 | Ms. Indu Krothwal | 18 |
| 5 | A Correlational Analysis between Change and Well-Being among Inorganic Agricultural Population (N-150) | Deepa Naik | 25 |
| 6 | Psychological Elements and Bigger's Mental State in Richard Wright's *'Native Son'* | Dr. S. S. Waghmare | 29 |
| 7 | Ethnicity and Identity Crisis in Nadine Gordimer's *'The Pickup'* | Dr. Ajay Patil | 34 |
| 8 | Diaspora had become Latest Trend in Indian English Literature | Rupam Biniwale | 38 |
| 9 | The Study of Code-Switching in Shobha De's Novel '*Starry Nights*' | Dr. Annasaheb Pawar | 44 |
| 10 | Concept and Importance of Eco-Criticism - Literature Perspective | Prof. Amit Ronghe | 49 |
| 11 | Big Data - Concepts, Analytics and Security : Overview | V. P. Mahajan, Dr. B. H. Barhate | 52 |
| 12 | Women Employment in Scheduled Commercial Banks | Dr. Sunil Gond | 59 |
| 13 | A Correlational Analysis between Attitude and Stress among Organic Agricultural Population (N-150) | Deepa Naik | 65 |
| 14 | Opportunities in Information Marketing | Amol Meshram | 69 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 15 | बच्चन जी की आत्मकथा *'दशद्वार से सोपान'* तक के संदर्भ में | डॉ. माधुरी जोशी | 73 |
| 16 | अमृता प्रीतम के अनुदित उपन्यासों में प्रेम का स्वरूप | डॉ. शोभा रावत | 77 |
| 17 | स्वांतत्र्योत्तर पत्र-पत्रिकाओं का हिंदी साहित्य में योगदान | डॉ. कमलिनी पशीने | 86 |
| 18 | मीडिया संकल्पना एवं स्वरूप | डॉ. हेमलता काटे | 89 |
| 19 | व्यंग की अवधारणा | प्रा. नंदिनी नरुटे, प्रा. डॉ. मधुकर राठोड | 93 |
| | **मराठी विभाग** | | |
| 20 | आदिवासींची सटीगीते व अंगाईगीते | डॉ. अंजली मस्करेन्हस | 98 |
| 21 | गुरूसंस्था : प्राचीन व मध्ययुगीन संदर्भ | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 107 |
| 22 | संत एकनाथांच्या भारूडांतील लोकतत्त्व : विशेष संदर्भ लोकसंस्कृतीचे उपासक | स्वाती लवंगे, प्रा. डॉ. दिलीप पवार | 113 |
| 23 | महात्मा बसवण्णांचे विद्रोही तत्त्वज्ञान | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 127 |
| 24 | सूफीवादाच्या उत्पत्ती संबंधी काही विचार | अमोगसिध्द चेंडके | 131 |
| 25 | कादंबरी : वाङ्मय प्रकार | डॉ. गजानन भामरे | 141 |





220

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
Nov. 2021

# महात्मा बसवण्णांचे विद्रोही तत्त्वज्ञान

**डॉ. राजेश्वर दुडूकनाळे**
(मराठी विभाग, देगलूर महा. देगलूर)

तत्त्वज्ञान समाजजीवनाचा अविभाज्य भाग आहे. कोणताही समाज काही विशिष्ट मूल्ये समोर ठेवून जीवनाला सामोरे जात असतो. भारतीय समाजालाही दर्शनांची मोठी परंपरा आहे. चार्वाक, कपिल, बुद्ध, महावीर यांनी मानवी जीवनाला नवी दिशा देणारे तत्त्वज्ञान मांडले. या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन भारतीय समाज अनेक अंगांनी उन्नत होत आला आहे. अर्थातच, मानवी समाजाच्या कोणत्याही काळात व्यक्तीपुढे प्रामुख्याने जगण्याचे दोन मार्ग असतात. वाट्याला आलेले जगणे नशिबाचा एक भाग समजून, त्याचा स्वीकार करून जगत राहणे, हा पहिला मार्ग झाला. माझे हे जगणे आणि माझा भोवताल नेमका असा का आहे? याची करणे शोधून स्वतःचे जगणे अधिक उन्नत करण्यासाठी आणि भोवताल अधिक सुंदर बनविण्यासाठी संघर्ष करणे, हा जगण्याचा दुसरा मार्ग आहे. या मार्गामध्ये माणसाला मोठा संघर्ष करावा लागतो. समाजातील अज्ञान, विषमता, शोषण, मानसिक गुलामी, जातीयता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, धर्मांधता नाकारून विवेकी मार्ग स्वीकारून शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी गांभीर्याने प्रयत्न करावे लागतात. अशाच प्रकारचे कार्य बाराव्या शतकात करून महात्मा बसवण्णा यांनी भारतीय समाजापुढे मोठा आदर्श निर्माण करून ठेवला आहे. सत्याची, विवेकाची बाजू घेऊन लढणाऱ्या वैचारिक परंपरेमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले आहे.

धर्म म्हणजे सत्याचा शोध...

खरे तर धर्म म्हणजे सत्याचा शोध... धर्म म्हणजे जगण्याचा विवेकी मार्ग! परंतु भारतीय समाजात धर्मातील सत्याची आणि विवेकाची जागा श्रद्धेने घेतली. परिणामी धर्मामध्ये शोषणाचा शिरकाव झाला आणि धर्मातील मानवतेची जागा शोषणाने घेतली. सत्याचा शोध घेणारे महात्मा बसवण्णा बालपणापासूनच विद्रोही असल्याचे लक्षात येते. त्यांनी परंपरेने चालत आलेले विचार आणि त्यापाठीमागे असलेले धर्माचे अधिष्ठान आंधळेपणाने स्वीकारले नाही. बालपणीच त्यांना अनेक महत्त्वाचे प्रश्न पडायचे. यज्ञात दूध, तूप का टाकायचे? त्यात निष्पाप प्राण्यांचा बळी का द्यायचा?, माणसा-माणसात भेदभाव का केला जातो?, देव कोटींच्या संख्येत आहेत का?, स्त्री ही भक्तीमार्गातील अडथळा कशीकाय होऊ शकते? तोंडाने म्हणायचे, देव सर्व प्राणीमात्रात आहे आणि प्रत्यक्षात त्यांचा बळी द्यायचा, असे का? धार्मिक विधी म्हणून मुंज करून घेण्याचा अधिकार फक्त उच्चवर्णीयांनाच का? अशा प्रश्नांच्या शोधात त्यांचे बालपण सुरु झाले. मुंज करून घेण्यास नकार देऊन नंतरच्या काळात त्यांनी घेतलेली वैचारिक भूमिका आणि त्या भूमिकेस अनुसरून केलेले काम विचारात घेतले तर महात्मा बसवण्णा हे मानवी जीवनातील सत्याचा शोध घेण्यासाठी निघालेले प्रवासी ठरतात. "शिखा सूत्र तोड तू संबंध... मग तुज बाध नाही नाही" असे संत तुकोबांनी म्हटले आहे. शेंडी आणि जानव्याचा गुलाम होण्यास नकार देऊन महात्मा बसवण्णांनी स्वतःचे माणूसपण सिद्ध केले. ही त्यांची कृती गुलामीच्या अंधाराला छेद देणारी आणि नव्या प्रकाशवाटा निर्माण करणारी आहे.

वेदप्रामाण्यास नकार..

वैदिक धर्मामध्ये वेदांना आणि त्यांच्या भूमिकेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या ग्रंथांना खूप महत्त्व आहे. वेद हे अपौरुषेय आहेत, अशीही या परंपरेला मानणाऱ्या लोकांची भूमिका असते. वेदांना प्रमाण मानून समाजाची विभागणी चार वर्णात करण्यात आली. त्यामुळे माणसा-माणसात भेदभाव सुरु झाला. हा भेदभाव दूर करून 'मानव तितुका एकच आहे' हे दाखवून देण्यासाठी महात्मा बसवण्णांनी आंदोलन उभे केले. समाजाला शोषणमुक्त करण्यासाठी कुडलसंगम येथे बारा वर्षे अध्ययन करून प्रत्यक्ष कृतीला सुरुवात केली. समता, मानवता, बंधुभावाचा मूल्यविचार या आंदोलनापाठीमागे होता. हे समतेचे आंदोलन उभे करताना महात्मा

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

बसवण्णांनी वेदप्रामाण्य नाकारले."वेदांना बासनात गुंडाळीन, शास्त्रांना बेडी घालीन, वेद म्हणजे पोपटपंची, शास्त्र म्हणजे बाजाराच्या वार्ता"[१] अशी घोषणा त्यांनी केली. धर्मप्रामाण्य, व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य झुगारून देऊन स्वतःच्या विवेकाचा आवाज त्यांनी महत्त्वाचा मानला.

जातिभेद नाकारला ..

भारतीय समाज हा वर्णजातींनी बनलेला आहे. ह्या वर्णजाती नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जातिअंताची चळवळ उदयास आली. यामध्ये बाराव्या शतकात महात्मा बसवण्णांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जातिव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाची पावले उचलली. अस्पृश्य मानल्या गेलेल्या व्यक्तींच्या घरी जाऊन त्यांनी स्नेहभोजन घेतले. आंतरजातीय विवाह घडवून आणले. लिहिण्याचा, अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला. 'जातविचार म्हणजे वेडाचार आहे', अशी भूमिका त्यांनी घेतली. "कोळीनीचा पुत्र नाव त्याचे व्यास, मार्कंडेय मांगिणीचा.. जातीचे श्रेष्ठत्व हाचि वेडाचार"[२] अशा वचनातून त्यांनी जातीव्यवस्थेवर कठोर प्रहार केले आहेत. जातीय अस्मिता टोकदार होत चाललेल्या वर्तमानात महात्मा बसवण्णांचा जातिअंताचा विचार अत्यंत प्रेरक ठरणारा आहे. प्रतिगामी शक्तींच्या विरुद्ध संघटीत होऊन लढण्याची प्रेरणा त्यांच्या आंदोलनातून मिळते. व्यक्तीच्या आचार-विचाराने, त्याच्या भाषण-संभाषण, लेखनाने माणूस माणसाशी जोडला गेला पाहिजे, हा संदेश घेऊन महात्मा बसवण्णांचे आंदोलन आपल्यापुढे उभे आहे.

यज्ञ संस्कृती अमान्य ..

कृषी संस्कृती ही भारताची मूळ ओळख आहे. या कृषी संस्कृतीला उद्ध्वस्त करून यज्ञ संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न वैदिक व्यवस्थेकडून झाला. या यज्ञ संस्कृतीनेच बळीराजाला मारले. "बळी सर्वस्वे उदार, जेणे उभारिला कर... करूनि कहार, तो पाताळी घातला" अशी नोंद संत तुकारामांनी आपल्या अभंगात करून ठेवली आहे.

महात्मा बसवण्णांनी या यज्ञ संस्कृतीवर कठोर शब्दात प्रहार केले आहेत. यज्ञ संस्कृतीचा उपहास करताना ते म्हणतात, "अग्नी देव म्हणून हवी देणाऱ्या ब्राह्मणाच्या घरास आग लागता, मोरीचे पाणी, रस्त्यावरची धूळ टाकून बोंब मारीत सर्वांना हाका मारतात, वंदन करणे सोडून अग्नीची निंदा करतात कुडलसंगमदेवा".[३] भारतीय समाजमन अशा अनेक विसंगतींनी दुभंगलेले आहे. एकीकडे नागाची पूजा करायची आणि प्रत्यक्षात तो दिसला तर त्याचा जीव घ्यायचा. स्त्रीला देवी म्हणायचे आणि प्रत्यक्ष जीवनात तिला दासीची वागणूक द्यायची. अन्नाला पूर्णब्रह्म म्हणायचे आणि विवाहासारख्या मंगल प्रसंगी त्यास अक्षता म्हणून पायदळी तुडवायचे!

यज्ञाला कर्मकांड म्हणूनही महात्मा बसवण्णांनी नाकारले आहे. खरे तर मूळ भारतीय कृषी संस्कृती अत्यंत सृजक आहे. कष्टपूर्वक नवनिर्मिती हे तिचे खास वैशिष्ट्य आहे. या कृषी संस्कृतीतील लोक जे अत्यंत कष्ट करून निर्माण करतात, त्या अन्नधान्याचा बळी अग्नीला देव मानून यज्ञात दिला जातो. म्हणून यज्ञात 'हवी' देणाऱ्या लोकांनी स्वतःच्या घराला आग लागल्यानंतर बोंब कशाला मारावी? असा उपरोधिक प्रश्न ते उपस्थित करतात.

देव रोकडा सज्जनी !

मानवी समाजाचा इतिहास हा अनेक संघार्षांनी भरलेला आहे. हा संघर्ष अगदी मानवाच्या आदिम अवस्थेपासून सुरू आहे. आपल्यावर येणारी संकटे दूर व्हावीत, आपले जीवन सुखी व्हावे म्हणून आदिमानवाने ईश्वर, धर्म, पूजा-आर्चा इ. आधार घेतला. नंतरच्या काळात धर्म आणि ईश्वर या संकल्पनांना संकुचित अर्थ प्राप्त होत गेला. प्रत्येक समूहाचा एक धर्म आणि त्यात्या धर्माचे ईश्वर अस्तित्वात आले. काळाच्या ओघामध्ये यात गुंतागुंत वाढत जाऊन धर्म आणि ईश्वर हे शोषणाचे आधार बनले. धर्म माणसासाठी न राहता माणूस धर्मासाठी

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
Nov. 2021

झाला आणि भूदेवांचे प्रस्थ वाढले. 'देवाधीन जगत्सर्वम्, मंत्राधीनंच देवच, ते मन्त्राः ब्राह्मणाधीनं, ब्राह्मणो मम दैवतम्' असा मंत्र वैदिक व्यवस्थेने प्रत्यक्षात आणला.

अर्थात, या शोषणाला विरोध करणारी आणि माणूसपणाला उन्नत बनविण्यासाठी संघर्ष करणारी, परंपराही भारताच्या सांस्कृतिक इतिहासात समांतरपणे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या परंपरेचे बाराव्या शतकातील उत्तम उदाहरण म्हणजे महात्मा बसवण्णांनी केलेले कार्य होय. दगडाचा, मुर्तीतला देव नाकारून सर्वांचा निर्माता एकच असल्याची भूमिका त्यांनी घेतली. किंबहुना माणूस हाच ईश्वर आहे, म्हणून माणसाने सदाचारी व्हावे, असा उपदेश त्यांनी केला. माणसाच्या अंतरंगातच उन्नतीचा मार्ग दडलेला आहे. "दगडाचा देव देव नव्हे, मातीचा देव देव नव्हे, वृक्ष देव देव नव्हे, धातूचा देव देव नव्हे.. देव तुमच्या अंतर्यामी.."[४] हा त्यांचा उपदेश आजही कर्मकांडाला भक्ती समजणाऱ्या लोकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

वैदिक परंपरेने देहाला दुय्यम मानून आत्मा या संकल्पनेस अधिक महत्त्व दिले आहे. महात्मा बसवण्णांनी मात्र मानवी देहाला श्रेष्ठ मानले आहे. 'सधन उभारिती शिवमंदिर, काय करू मी गरीब पामर, खांब असती माझे पाय, मम देहची होय देवालय, शीर हे सुवर्णकलश पहा' असा देहाचा गौरव त्यांनी केला आहे. मंदिर संस्कृतीला अनेक महामानवांनी नाकारले आहे. मंदिरातून सर्वसामान्य माणसाचे मोठ्याप्रमाणात शोषण होत आले आहे. 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' हा प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचा ग्रंथ यासंदर्भात महत्त्वाचा आहे. देवळात देव नसतो तर पुरोहितांचे पोट असते, असे संत गाडगेबाबा सांगायचे. यावरून बाराव्या शतकात महात्मा बसवण्णांनी 'मम देहची होय देवालय' अशी घेतलेली भूमिका अत्यंत क्रांतिकारी मानावी लागेल. मंदिरांचा बाजार मांडून अध्यात्माची विक्री करणाऱ्या वर्तमानात महात्मा बसवण्णांची ही भूमिका प्रेरक ठरणारी आहे.

अंधश्रद्धा, कर्मकांडावर प्रहार

अज्ञान, अंधश्रद्धा, मानसिक-बौद्धिक गुलामी, कर्मकांड आणि ढोंगीपणावर महात्मा बसवण्णांनी कठोर शब्दात प्रहार केले आहेत. उपास-तापास, व्रत-वैकल्य, शुभाशुभाच्या कल्पना यातील फोलपणा त्यांनी दाखवून दिला आहे. व्रत करणाऱ्याबद्दल ते म्हणतात, "पाषाणाच्या नागाला दूध पाजिताती.. जित्या पाहता मारिती त्या| भुकेल्या जंगमा हाकोनिया देती.. लिंगा दाखविती नैवद्य"[५] बसवण्णांनी माणसाच्या ढोंगीपणावर हल्ला चढविला. त्यामुळे सामान्य माणूस विचार करू लागला. त्यांची मते लोकांना पटू लागली. समाज बदलू लागला.

आज भारतीय समाज विज्ञान युगात वावरतो आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. असे असूनही समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, मानसिक-बौद्धिक गुलामी, कर्मकांड, ढोंगीपणा मात्र कमी होण्याऐवजी वाढतो आहे. ही भारतीय समाजाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

स्त्रीस्वातंत्र्याची घोषणा

स्त्री हा समाजजीवनाचा महत्त्वाचा घटक आहे. स्त्री आणि परुष एकमेकांसाठी अत्यंत पूरक असताना पुरुष स्त्री विरुद्ध असे चित्र निर्माण करण्यात आले. स्त्रीला दुय्यम मानून तिला हक्क-अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. मनुस्मृतीने तर स्त्री स्वातंत्र्याला लायक नाही, असे म्हटले आहे. स्त्रीने बालपणी वडिलांच्या अधीन, तरुणपणी नवऱ्याच्या तर म्हातारपणी मुलाच्या अधीन रून जीवन जगावे, असा नियमाच मनुस्मृतीने घालून दिला आहे. मैत्रायणी संहिता तर स्त्रीला तीन शूद्र गोष्टींपैकी एक मानते. ती म्हणजे दारू, जुगार आणि स्त्री. तैतरीय संहिता अत्यंत दुष्ट पुरुषापेक्षा उत्तम स्त्री शूद्र मानते. या पार्श्वभूमीवर महात्मा बसवण्णांनी बाराव्या शतकात महिलांच्या संदर्भात घेतलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पुरुषाप्रमाणे त्यांनी महिलांना समान हक्क दिले. लिंग धारण करण्याचा, लिहिण्याचा अधिकार दिला. त्यामुळे ३५ स्त्रियांनी वचनांची रचना केली. सर्व जातीच्या स्त्रियांना त्यांनी अनुभव मंटपात स्थान दिले. ७७० शरणांपैकी वीस टक्के महिला होत्या. महात्मा बसवण्णांचे हे कार्य अत्यंत क्रांतिकारी आणि दिशादर्शक आहे. एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले

बसवण्णांनी वेदप्रामाण्य नाकारले."वेदांना बासनात गुंडाळीन, शास्त्रांना बेडी घालीन, वेद म्हणजे पोपटपंची, शास्त्र म्हणजे बाजाराच्या वार्ता"[१] अशी घोषणा त्यांनी केली. धर्मप्रामाण्य, व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य झुगारून देऊन स्वतःच्या विवेकाचा आवाज त्यांनी महत्त्वाचा मानला.

जातिभेद नाकारला ..

भारतीय समाज हा वर्णजातींनी बनलेला आहे. ह्या वर्णजाती नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जातिअंताची चळवळ उदयास आली. यामध्ये बाराव्या शतकात महात्मा बसवण्णांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जातिव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाची पावले उचलली. अस्पृश्य मानल्या गेलेल्या व्यक्तींच्या घरी जाऊन त्यांनी स्नेहभोजन घेतले. आंतरजातीय विवाह घडवून आणले. लिहिण्याचा, अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला. 'जातविचार म्हणजे वेडाचार आहे', अशी भूमिका त्यांनी घेतली. "कोळीनीचा पुत्र नाव त्याचे व्यास, मार्कंडेय मांगिणीचा.. जातीचे श्रेष्ठत्व हाचि वेडाचार"[२] अशा वचनातून त्यांनी जातीव्यवस्थेवर कठोर प्रहार केले आहेत. जातीय अस्मिता टोकदार होत चाललेल्या वर्तमानात महात्मा बसवण्णांचा जातिअंताचा विचार अत्यंत प्रेरक ठरणारा आहे. प्रतिगामी शक्तींच्या विरुद्ध संघटीत होऊन लढण्याची प्रेरणा त्यांच्या आंदोलनातून मिळते. व्यक्तीच्या आचार-विचाराने, त्याच्या भाषण-संभाषण, लेखनाने माणूस माणसाशी जोडला गेला पाहिजे, हा संदेश घेऊन महात्मा बसवण्णांचे आंदोलन आपल्यापुढे उभे आहे.

यज्ञ संस्कृती अमान्य ..

कृषी संस्कृती ही भारताची मूळ ओळख आहे. या कृषी संस्कृतीला उद्ध्वस्त करून यज्ञ संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न वैदिक व्यवस्थेकडून झाला. या यज्ञ संस्कृतीनेच बळीराजाला मारले. "बळी सर्वस्वे उदार, जेणे उभारिला कर... करूनि कहार, तो पाताळी घातला" अशी नोंद संत तुकारामांनी आपल्या अभंगात करून ठेवली आहे.

महात्मा बसवण्णांनी या यज्ञ संस्कृतीवर कठोर शब्दात प्रहार केले आहेत. यज्ञ संस्कृतीचा उपहास करताना ते म्हणतात, "अग्नी देव म्हणून हवी देणाऱ्या ब्राह्मणाच्या घरास आग लागता, मोरीचे पाणी, रस्त्यावरची धूळ टाकून बोंब मारीत सर्वांना हाका मारतात, वंदन करणे सोडून अग्नीची निंदा करतात कुडलसंगमदेवा".[३] भारतीय समाजमन अशा अनेक विसंगतींनी दुभंगलेले आहे. एकीकडे नागाची पूजा करायची आणि प्रत्यक्षात तो दिसला तर त्याचा जीव घ्यायचा. स्त्रीला देवी म्हणायचे आणि प्रत्यक्ष जीवनात तिला दासीची वागणूक द्यायची. अन्नाला पूर्णब्रह्म म्हणायचे आणि विवाहासारख्या मंगल प्रसंगी त्यास अक्षता म्हणून पायदळी तुडवायचे!

यज्ञाला कर्मकांड म्हणूनही महात्मा बसवण्णांनी नाकारले आहे. खरे तर मूळ भारतीय कृषी संस्कृती अत्यंत सृजक आहे. कष्टपूर्वक नवनिर्मिती हे तिचे खास वैशिष्ट्य आहे. या कृषी संस्कृतीतील लोक जे अत्यंत कष्ट करून निर्माण करतात, त्या अन्नधान्याचा बळी अग्नीला देव मानून यज्ञात दिला जातो. म्हणून यज्ञात 'हवी' देणाऱ्या लोकांनी स्वतःच्या घराला आग लागल्यानंतर बोंब कशाला मारावी? असा उपरोधिक प्रश्न ते उपस्थित करतात.

देव रोकडा सज्जनी !

मानवी समाजाचा इतिहास हा अनेक संघार्षांनी भरलेला आहे. हा संघर्ष अगदी मानवाच्या आदिम अवस्थेपासून सुरू आहे. आपल्यावर येणारी संकटे दूर व्हावीत, आपले जीवन सुखी व्हावे म्हणून आदिमानवाने ईश्वर, धर्म, पूजा-आर्चा इ. आधार घेतला. नंतरच्या काळात धर्म आणि ईश्वर या संकल्पनांना संकुचित अर्थ प्राप्त होत गेला. प्रत्येक समूहाचा एक धर्म आणि त्यात्या धर्माचे ईश्वर अस्तित्वात आले. काळाच्या ओघामध्ये यात गुंतागुंत वाढत जाऊन धर्म आणि ईश्वर हे शोषणाचे आधार बनले. धर्म माणसासाठी न राहता माणूस धर्मासाठी

आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नामुळे महिलांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा मोठ्याप्रमाणात प्रसार झाला. तरीही भारतीय स्त्री शोषणमुक्त झाली नाही. ती आजही कर्मकांडात, दैववादात, पुरुषी दास्यात अडकलेली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीची ती बळी ठरत आहे. काही अपवाद वगळता आजही महिलांना निर्णयप्रक्रियेमध्ये सामावून घेतले जात नाही. तिच्या कोणत्याही कृतीकडे स्त्रीत्वाच्या दृष्टीनेच पाहिले जाते. या परिस्थितून बाहेर पडण्यासाठी, स्त्रीला सन्मानाने 'माणूस' म्हणून उभे राहण्यासाठी महात्मा बसवण्णांनी बाराव्या शतकात केलेले कार्य नक्कीच प्रेरणादायी आणि उद्बोधक ठरणारे आहे.

अनुभव मंटप - मानवी स्वातंत्र्याचा जयघोष

महात्मा बसवण्णांचा संपूर्ण संघर्ष मानवी स्वातंत्र्यासाठी आहे. अर्थातच मानवी जीवनात स्वातंत्र्य या मूल्याला खूप महत्त्व आहे. 'जो माणूस मनाने स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेल्यासारखा आहे,' असे स्वातंत्र्याचे महत्त्व सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. अशाप्रकारचे स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी महात्मा बसवण्णांनी बाराव्या शतकात 'अनुभव मंटप' नावाचे सांस्कृतिक पीठ उभारले. सातशे पुरुष आणि सत्याहत्तर स्त्रिया या अनुभव मंटपाच्या सदस्य झाल्या. यांना शरण आणि शरणी म्हटले जात असे. मानवी जीवनातील अनेक विषयांवर याठिकाणी चर्चा होत असे. सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक विषयांची येथे चिकित्सा केली जात असे. शतकानुशतके जीभ असूनही शूद्रातिशूद्र वर्गाला बोलण्याचा, चिकित्सा करण्याचा अधिकार नव्हता. अनुभव मंटपाच्या माध्यमातून हा अधिकार सर्वांना प्राप्त झाला. जात, धर्म, गोत्र, स्त्री, पुरुष अशा कोणत्याही गोष्टीला येथे थारा नव्हता. सामाजिक समता हे या अनुभव मंटपाचे महत्त्वाचे तत्त्व होते. म्हणून अनुभव मंटप म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा उद्गार होता.

'सत्यासत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' अशी भूमिका घेऊन आपल्यापर्यंत येणारी माहिती आपण तपासून घेतली पाहिजे. अलीकडच्या काळात माहिती तंत्रज्ञानामुळे आणि समाजमाध्यमांमुळे माहितीचा स्फोट झालेला आहे. त्यामुळे अनुभव मंटपाचा चिकित्सक दृष्टिकोन आजही तितकाच उपयुक्त ठरणारा आहे.

मानवी जीवनाला सर्वांगाने उन्नत करण्यासाठी आवश्यक असणारी मूल्ये महात्मा बसवण्णांनी समाजात पेरण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व समाजाला पटवून देण्याचे कार्य त्यांनी आपल्या कृतीतून केले. कृतीशील तत्त्वज्ञ म्हणून त्यांचे जीवनकार्य आजही तितकेच प्रेरणादायी आहे.

**संदर्भसूची :**

१. बसवतत्त्वांचे आचरण आणि आपण – डॉ. बसवलिंग पट्टदेवरू, प्रकाशक महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी- दुसरी आवृत्ती २०१० पृ. क्र. ४५
२. आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर – डॉ. अशोक मेनकुदळे, प्रकाशक महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी-, दुसरी आवृत्ती, २००८ पृ. क्र. ७२
३. आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर – डॉ. अशोक मेनकुदळे, प्रकाशक महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी-, दुसरी आवृत्ती, २००८ पृ. क्र. ७५
४. विचारशलाका – संपादक नागोराव कुंभार ऑक्टो. २०१९ ते जून २०२० जोड अंक १३२, १३३, १३४ पृष्ठ क्र.१८५
५. आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर – डॉ. अशोक मेनकुदळे, प्रकाशक महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी-, दुसरी आवृत्ती, २००८ पृ. क्र. ९०

Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor